**‘‘<u>प्रेस नोट</u>’’**

**गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष-१०, मुंबई** **दिनांक :- ०१/०९/२०२६**

## अंमली पदार्थ एम.डि. तस्करी प्रकरणात ०२ आरोपींना १० वर्षे सक्तमजुरी व प्रत्येकी १ लाख रुपये दंडाची शिक्षा झालेबाबत...

दिनांक २८/०३/२०२४ रोजी कक्ष १० गुन्हे शाखा मुंबई यांना प्राप्त गोपनीय खबरीच्या अनुषंगाने पथकाने ओशिवरा पोलीस ठाणेच्या हद्दीत छापा मारला असता यातील आरोपीत नामे आकाश अनिल सिंग, वय २६ वर्षे, हा त्याच्या ताब्यात ५५ ग्रॅम वजनाचा एम.डी. अं.कि. रु ११,००,०००/- व आरोपी नामे भवन हयात सिंग अधिकारी, वय ४० वर्षे, हा त्याच्या ताब्यात १०५ ग्रॅम अं.कि. ३२,००,०००/- एकुण १६० ग्रॅम वजनाचा मेफोड्रॉन (एम.डी) एकुण किंमत ४३,००,०००/- हा अंमली पदार्थ वाहतुक, विक्री व व्यापार करण्याच्या उद्देशाने कब्जात बेकायदेशिर रित्या बाळगताना मिळुन आल्याने सदरबाबत दिनांक २८/०३/२०२४ रोजी कक्ष १० गुन्हे शाखा, मुंबई गु.प्र.शा., वि.स्था.गु.र.क्र.२८/२०२४ अन्वये व (ओशिवरा पोलीसठाणे, वि.स्था. गु.र.क्र. ३०९/२०२४),कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक मनोज सुतार, कक्ष १० व त्यांच्या अधिपत्याखालील तपास पथकाने अत्यंत कौशल्यपुर्वक शास्त्रोक्त व तांत्रिक तपास करून तपासादरम्यान उपलब्ध पुरावे, गुन्हयाची कागदपत्रे, साक्षीदारांचे जबाब तसेच इतर महत्वाच्या बांबीचे योग्यप्रकारे संकलन करून सदर प्रकरण मा. विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्रासह दाखल केले.

सदर प्रकरणी मा. विशेष सत्र न्यायालय, मुंबई येथे सुनावणी सुरू असताना तपासी अधिकारी पोनि. सुतार, सह तपासी अधिकरी सहा.पोलीस निरीक्षक धनराज चौधरी, (कक्ष-५), सहा.पोलीस निरीक्षक गणेश तोडकर, पैरवी अधिकारी मसपोनि. यादव, सफौ. ३०६१२/शेख, मपोअं. ११२११०/खाडे यांनी प्रकरणातील उपलब्ध पुरावे व तपासाच्या अनुषगांने आवश्यक ती योग्य कार्यवाही करून मा. न्यायालयासमक्ष प्रकरणाची योग्यरीत्या बाजु मांडली. तपासादरम्यान केलेल्या परीश्रमामुळे व उपलब्ध पुराव्याच्या योग्य सादरीकरणामुळे मा. विशेष सत्र न्यायालय, मुंबई यांनी गुन्हयातील दोन्हीही आरोपीतांना दिनांक ३१/०८/२०२६ रोजी १० वर्षाची सक्त मजुरी व १ लाख रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

**मा. विशेष सत्र न्यायालय, मुंबई मार्फत शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे.**

**१) आकाश अनिल सिंग, वय २६ वर्षे,**
**२) भवन हयातसिंग अधिकारी, वय ४० वर्षे**

सदर कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण १) श्री. नवनाथ ढवळे व मा. सहा. पोलीस आयुक्त (डी. पश्चिम) श्री. धर्मपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष १० चे प्रभारी पोलीस निरीक्षक विशाल राजे, पोलीस निरीक्षक मनोज सुतार (तत्कालीन नेमणुक कक्ष १०), सहा.पोलीस निरीक्षक धनराज चौधरी (कक्ष-५), महिला सहा. पोलीस निरीक्षक पुनम यादव, सहा.पोलीस निरीक्षक गणेश तोडकर, सहा. पोलीस उप निरीक्षक अहमद शेख (कोर्ट कारकुन सत्र न्यायालय), महिला पोलीस शिपाई क्रमांक ११२११०/ खाडे (कोर्ट कारकुन सत्र न्यायालय) यांनी पार पाडली.

*******